रजि. नं. : ई -६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोस्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : + ९१-२४२३ - २५८५०० फॅक्स : + ९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/ पाणी पुरवठा / 1309/२०२१

दिनांक:- 14 OCT 2021

प्रति,

-------------------------------------------

-------------------------------------------

-------------------------------------------

**विषय:- संस्थान कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत ...**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पुरवठा विभागामार्फत संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेकामी दरपत्रके / कोटेशन मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र | कनकुरी साठवण तलाव येथील मासे प्रकार | मासे पकडण्याचा कालावधी |
|---|---|---|
| ०१ | ०१ किलो वजनाचे आतील सर्व मासे (प्रति किलो दर) | ३० दिवस |
| ०२ | ०१ किलो वजनाचे पुढील सर्व मासे (प्रति किलो दर) | |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मदाय संस्था असल्याने खालील अटी व शर्तीनुसार जास्तीत-जास्त दर सिलबंद पाकीटात **"मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ता.राहाता, जि.अहमदनगर पीन-४२३१०९" या पत्यावर **दि.२५/१०/२०२१ अखेर सायं ५.००** वाजेपर्यंत आवक विभागात जमा करावेत. पाकीटावर **"संस्थान कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत कोटेशन"** असा वरील बाजूस स्पष्ट उल्लेख असावा.

**अटी व शर्ती:-**

१. संस्थानचे कनकुरी येथील तलावातील मासे पकडणेसाठी नेमून दिलेल्या कालावधीत मासे पकडावयाचे आहेत.
२. ज्या कोटेशनधारकाचे दर सर्वात जास्त असतील त्यास मान्यता देण्यात येईल.
३. मासे पकडण्याचे काम स्वत:चे साहित्यासह स्वत:चे व्यक्तींकडून करावयाचे आहे.
४. मासे पकडतांना कोणताही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संस्थानवर राहणार नाही.
५. मासे पकडलेनंतर संस्थानमार्फत लहान-मोठे मासे (सर्व जातीचे मासे) यांचे ०१ किलोचे आतील व ०१ किलोपेक्षा अधिक वजन वेगळे-वेगळे केले जाईल. तसेच वजनात कुठल्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. मास्यांची वजनाप्रमाणे होणारी मंजूर दराने रक्कम त्वरीत द्यावी लागेल. त्याशिवाय आपणास मालाचा ताबा दिला जाणार नाही.
६. ज्या व्यक्तींचा टेंडरशी संबंध नाही अशा व्यक्तींना साठवण तलावावर येता येणार नाही.
७. संस्थानचे साठवण तलावावर किंवा संस्थान परिसरात मासे विक्री करता येणार नाही.
८. साठवण तलावावर मासे पकडतांना काही वाद झाल्यास किंवा काही गैरप्रकार आढळुन आल्यास आपले टेंडर रद्द करण्याचे अधिकार संस्थानकडे राहतील.
९. मासे पकडतांना मासे मारण्यासाठी कुठल्याही प्रकाचे केमिकल्सचा वापर करता येणार नाही/ अथवा पाण्यात कोणतेही केमिकल टाकता येणार नाही.
१०. सदरची टेंडरसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता न्यायकक्षेत राहील.

कळावे,

"श्री साईबाबांचे शुभाशिर्वादासह"

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी